# उत्तरायण

किसनराव मुजुमदार लग्न करून राहायला आले ते गिरगावातल्या लक्ष्मी चाळीत. त्यावेळी चाळीतल्या दोन खोल्या असणे हा नवऱ्या मुलाचा अधिक गुण होता. वासंती पण स्वतःच्या हक्काच्या स्वतंत्र बिऱ्हाडात खूश होती. मुजुमदार बँकेत नोकरी करीत होते. चाळ म्हणजे अडीअडचणीतले एकत्र कुटुंबच. त्यामुळे दोन मुलगे झाले व ते कधी मोठे झाले हे वासंतीला कळलेच नाही. शेजारच्या मामी, मावशी, वहिनी सल्ला द्यायला, मदतीचा हात पुढे करून तयार असत. त्यामुळे किसन मुजुमदारांचे व त्यांचेही आईवडील आपले उत्तर आयुष्य कारवारला आरामात व्यतीत करीत होते. मुलांना सुट्टी पडली की महिनाभर सासर माहेर करून त्या भरपूर कारवारी मेवा घेऊन येत व आपल्या चाळ सहकाऱ्यांना भरभरून वाटत. त्या दिवशी शेजारचे मोने आले व किसनरावांना म्हणाले, आता मुले मोठी होताहेत. मोनेंना दोन मुली व एक मुलगा होता. मोने पुढे म्हणाले, तिकडे बोरिवलीला श्रीकृष्ण नगरमध्ये एक हौसिंग सोसायटी होते आहे. बिल्डर चांगला आहे. माहितीचा आहे. आपण दोघा चौघांनी तिथे एकत्र ब्लॉक घेतले तर मोठे घरही होईल व शेजारही राहिल. कल्पना सर्वांनाच आवडली. मोने, कामत, दातार, हतंगडी, मुजुमदार सर्वांनीच मग त्या सोसायटीत ब्लॉक घेण्याचे ठरवले. ज्याला जसा परवडेल तसा एक बेडरूम, दोन बेडरूम, हॉल, किचन असे ब्लॉक नोंदवले. बिल्डर खरोखरच चांगला होता. साधारण दीड वर्षांत जागा तयार झाल्या. त्याने आजूबाजूची मोठी झाडे न तोडता बिल्डिंगमधल्या मोकळ्या जागेवर हिरवे लॉन केले. त्यावेळी कार पार्किंगची समस्या नव्हती, कारण सगळे असेच मध्यमवर्गीय. चाळीतून जेमतेम पैशाची सोय करून ब्लॉकमध्ये आलेले होते. जागा हवेशीर, आजूबाजूला छान हिरवी झाडी. सगळेजण खूश झाले. जवळजवळ पाच बिल्डिंग होत्या. त्यांची मिळून एक को-ऑपरेटिव्ह सोसायटी झाली. मुलांना खेळायला मोकळी जागा होती. सोसायटीत मोठे पण मुलांच्यात सामील होत असत. त्यामुळे सर्व सभासदात

चांगले गोडी गुलाबीचे संबंध होते. अडचणीच्या वेळी मदत करायला कोणीही तत्पर असे. अशा छान वातावरणात मुले मोठी झाली. मोठा संजय मेडिकलला गेला. एम.बी.बी.एस. झाल्याबरोबर पुढील शिक्षणासाठी अमेरिकेला गेला. मग तिथेच स्थायिक झाला. त्याने त्याच्याबरोबर शिकणारी मार्था हिच्याबरोबर लग्न केले. किसनराव व वासंती जरा हिरमुसले. परंतु सोसायटीतल्या सर्व लोकांनी त्या गोष्टीचे असे कौतुक केले की त्यांचे हिरमुसलेपण पळून गेले. त्यानंतर संजय सपत्नीक मुंबईला आला. मार्थाला दिल्ली, ताजमहल वगैरे बघायचे होते. पंधरा दिवस त्यांची टूरच झाली. त्यानंतर घरी चार आठ दिवसच राहिले. सोसायटीतल्या लोकांनी त्यांचे आनंदाने स्वागतही केले आणि कौतुकाने निरोपही दिला. त्यानंतर धाकटा विजय आय.आय.टी.मधून कॉम्प्युटर इंजिनीअर झाला. काही दिवसांनी तो कॅलिफोर्नियाला गेला. त्याच्याबरोबर त्याची इथली क्लासमेट वसुधा पण गेली, पण जाताना दोघे लग्न करून गेली. किसन वासंतीला तेवढंच समाधान झाले.

किसनराव रिटायर्ड झाले. त्यानंतर दोनदा अमेरिकेला जाऊन अमेरिका फिरून बघून आले. संजयला एक मुलगी रीना व एक मुलगा क्रिश आणि विजयला एक मुलगा अमित अशी मुजुमदार फॅमिलीची वाढ झाली होती, पण इथे ती दोघेच होती. दोघांनीच एव्हढ्या मोठ्या घरात राहायला जड जात होते. अमेरिकेत नातवंडांबरोबर राहायला मजा येत होती. ती छोटीसुद्धा आजीआजोबांच्या मागे मागे असत. आता वय वाढत होते. दोघांनीच एकटे राहायचे. दोघांसाठीच इवले इवले शिजवायचे याचा वासंतीला त्रास होई. कारण मुले असताना भरपूर प्रकार, भरपूर प्रमाणात करायचे व त्यांना आणि त्यांच्या मित्रमैत्रिणींना पण खाऊ घालायचे अशी तिची आवड होती. सोसायटीतले जुने सहकारी येऊन जाऊन असत. तरुण पोरे म्हणत, 'काका काही अडचण असली तर बिनधास्त सांगायचं. अगदी अर्ध्या रात्री फोन केलात तरी नो प्रॉब्लेम.' एकदा वासंतीला चक्कर आली आणि उलटी झाली. किसनराव घाबरले. त्यांनी शेजारच्या वसंतला बोलावले. त्याने लगेच डॉक्टरना बोलावून आणले. डॉक्टर म्हणाले पित्तामुळे असावी. रात्री नीट झोप पडली नसावी. तरीसुद्धा वयपरते सर्व टेस्ट करून घ्या. तिकडून मुले नेहमीच सांगत की नियमित सर्व टेस्ट करून घ्या. पैशाची काळजी करू नका. तब्येतीची काळजी घ्या, पण जुने हाड असल्या गोष्टी मानायला तयार नसे. काही होत नसताना उगीचच डॉक्टरवर खर्च कशाला करायचा असा

सरळ हिशेब असे, पण आता वसंताने दोघांच्या सर्व टेस्ट करून घेतल्या. डॉक्टरनी रिपोर्ट बघून सर्व काही नार्मल आहे. जरा अशक्तपणा आहे. रोज दोघांनी बी कॉम्प्लेक्स आणि कॅल्शियमची एक एक गोळी घ्यावी असे सांगितले.

दिवस शांतपणे सरत होते. मुलांची, नातवंडांची आठवण यायची. फोनवर बोलणे व्हायचे. मध्ये बरेच दिवस गेले. एकदा संजय पंधरा दिवसाच्या सुट्टीवर आला. घर आनंदले. फुलले. यावेळी तो एकटाच आला होता आणि त्याला कुठेही बाहेर जायची इच्छा नव्हती. फक्त आईबाबांबरोबर घरीच राहायचे होते. वासंतीला खूप आनंद झाला. तिने त्याला सर्व तऱ्हेच्या मासळीचे निरनिराळे प्रकार करून घातले. कारण इथल्यासारखी ताजी मासळी अमेरिकेत कुठे मिळते. जाताना त्याने सांगितले, आता तुम्ही दोघेच इथे राहू नका. मी मोठा बंगला घेतला आहे. तुमच्यासाठी ग्रीनकार्डसाठी अर्ज केला आहे. तेव्हा ही जागा विकून माझ्याकडे येऊन राहा. तुमच्या काळजीने मलाही बेचैन वाटते. मुलाचे हे बोलणे ऐकून वासंती हरकली. तिने त्याला आम्ही लवकरच येतो असे सांगितले. जिथे आपली मुले तिथेच आपले शेवटचे दिवस काढावेत असा विचार करून किसनरावांनी सोसायटीच्या मेंबरना आपला ब्लॉक विकायचा निर्णय कळवला. वसंतने लगेच काका मीच तुमची जागा घेतो, कारण मन्याचे (धाकटा भाऊ) लग्न झाले की आमची जागा अपुरी पडणार असे सांगितले. आपल्या माणसात सौदा काय ठरवायचा? वसंताने योग्य भाव देतो असे सांगितले. बँकेतून कर्ज घेऊन बाजारभावाने तो ब्लॉक खरेदी केला. किसनरावांनी पैसे आपल्या बँकेत भरले व गरज पडल्यास ते डॉलरमध्ये मिळतील याची खात्रीही करून घेतली. सर्व गोष्टी तशा झटपट झाल्या. दोन महिन्यांनी साश्रू नयनांनी सोसायटीतील सग्या सोयऱ्यांचा निरोप घेऊन मुजुमदार कुटुंब न्यू जर्सीला रवाना झाले.

तिकडे संजय व मुले नेवार्क एअरपोर्टवर आली होती. घरी पोचल्यावर संजयचा एव्हढा मोठा बंगला बघून वासंतीला लेकाचा अभिमान वाटला. समोर मोठी गार्डन, बाजूला स्वीमिंगपूल, मागे मोठे मोठे वृक्ष सर्व छान होते. तळमजल्यावर किचन, फॅमिलीरूम, मोठी ड्रॉइंगरूम व त्याला जोडून डायनिंग रूम. शिवाय बाजूला दोन बेडरूम गेस्टसाठी असा ऐस बैस बाज होता. वरच्या मजल्यावर संजय मार्थाची मोठी बेडरूम, दोन मुलांच्या व आणखी दोन अशा पाच खोल्या होत्या. आजी आजोबांना वर खाली करणे त्रासाचे होईल म्हणून त्यांचे सामान खालच्या बेडरूममध्ये लावले. एकंदर बंगला

बराच मोठा होता. सहा महिने मजेत गेले. नातवंडे खूश होती, कारण आजीआजोबा बऱ्याच दिवसांनी आले होते. आजी नवीन नवीन पदार्थ करायची. आग्रहाने खाऊ घालायची. इंडियाच्या गमती जमती सांगायची. आजोबा संजय विजयच्या बालपणीच्या आठवणी रंगवून सांगायचे. मुलांना मौज वाटायची. सुरुवातीला नावीन्य होते. मग त्यांच्या रोजच्या रुटिनमध्ये आजीआजोबांची अडगळ वाटू लागली. त्याचे स्कूल, वेगवेगळे क्लास, स्वीमिंग, जीम यात त्यांना आजीआजोबांबरोबर बोलायला वेळ मिळेना. घरी आल्यावर आपापल्या खोलीत टी.व्ही.वर कार्टून बघण्यात त्यांना जास्त इंटरेस्ट वाटे. आजी आजोबा जिने चढून वर जात नसत. संजयने त्यांच्या खाली त्यांना टी.व्ही. घेऊन दिला होता व त्यावर झी मराठी, काही हिंदी चॅनेल त्यांना बघता येत. थोड्या दिवसांनी मार्थाला त्यांची स्वैपाकघरातील लुडबूड नको वाटायला लागली. तिला इंडियन कुसाइनमध्ये जाऊन इंडियन जेवायला आवडे, पण घरात ते नको होते. ती तिच्या पद्धतीने जेवण करी ते या दोघांना खायला जमत नसे. शेवटी संजयने दुसरी बेडरूम किचनमध्ये कन्व्हर्ट करून त्यांचे वेगळेच बिऱ्हाड करून दिले. तो त्यांना आठवड्याचे सामान इंडियन स्टोअरमधून आणून देई. त्यांना काय हवे नको ते पाही. दिवसातून एकदा तरी भेटण्याचा प्रयत्न करी, पण कधी कधी ते त्याला जमत नसे.

मार्था आणि नातवंडे आपल्याच विश्वात मग्न असत. त्यांना आपल्याच बंगल्यात ग्रँड पेरेंटस आहेत व ते आपल्याशी बोलायला आसुसलेले असतात याची जाणीवच नसे. घरातून बाहेर पडून रस्त्यावरून फिरणे त्या दोघांना अशक्यच होते. भरधाव गाड्यांची वाहतूक, जवळपास मॉल, दुकाने नाहीत. लांब लांब एकांडे बंगले, तेही संबंध दिवस मिटलेले. रात्रीच्या काळोखात लाईटमुळे त्यांचे अस्तित्व जाणवे. आपल्या माणसात सख्ख्या मुलाच्या घरी राहत असून किसन-वासंतीला मोकळ्या वाळवंटात मुक्काम केल्यासारखे वाटू लागले. पुढ्यात अथांगसागर पसरलेला असावा. लाटेवर लाटा येऊन पायाखालची वाळू सरकवून घेऊन जात असावा. तहानेने घशाला कोरड पडली आहे हे जाणवते आहे. पुढ्यात एव्हढा मोठा जलाशय असून तहानले रहावे लागावे अशी त्या दोघांची अवस्था झाली होती. कधी तरी शनिवारी, रविवारी बाहेर जेवायला जाताना संजय म्हणायचा, आई पपांना पण नेऊ या, पण मार्थाच्या चेहऱ्यावरची नाराजी ओळखून किसन-वासंती कसली तरी सबब पुढे करून ते टाळत. दोघेही या एकटेपणाला कंटाळून गेले होते. आता

आपले आयुष्य असेच जाणार, कारण भारतातला ब्लॉक विकून इथे आलोय. आपणच आपले मागचे दोर कापले अशा विचाराने ते अधिकच दुःखी होत.

एकदा विजयचा फोन आला तेव्हा वासंती म्हणाली, 'अरे अमितची फार आठवण येते आहे? तर मग या इथे रहायला' विजय म्हणाला. पडत्या फळाची आज्ञा मानून दोघेही निघाले. संजयने तिकिटाची व्यवस्था केली. तिकडे गेल्यावर आठवडा अगदी मजेत गेला. विजय व वसुधा दोघांनी रजा घेतली होती. अमितच्या शाळेला पण आठवड्याची सुट्टी होती. इकडे तिकडे फिरणे, बाहेर हॉटेलमध्ये जेवणे, गप्पागोष्टी या सर्वात आजी आजोबा खूश झाले. दुसऱ्या आठवड्यात त्यांचे रुटिन सुरू झाले. सकाळपासून वसुधाची धावपळ, विजयवर अमितला सोडा आणायची जबाबदारी. सबंध दिवस आजी आजोबा दोघेच घरी पण संध्याकाळ झाली की घर भरे व पटकन सकाळ उगवे. संध्याकाळी एकत्र जेवण, दिवसभराच्या गोष्टी. त्यांना खूप बरे वाटे, पण विजयकडे जागेची अडचण होती. त्याचे अपार्टमेंट छोटे होते. दोनच बेडरूम त्यामुळे अमितच्या खोलीत खाली गादी पसरून त्यांना झोपावे लागेल. एक दिवस विजय म्हणाला, आईपपा तुम्ही इथे राहायला खूश आहात हे मला जाणवतय, पण मी यापेक्षा मोठे घर घेऊ शकत नाही. इथला खर्च सर्वच बाबतीत जास्त आहे. घरे महाग, खाण्यापिण्याच्या वस्तू महाग. आम्ही दोघे मिळवतो ते जेमतेम पुरते म्हणून आम्ही एकट्या अमितवरच थांबलो. कारण त्याच्या पुढच्या शिक्षणाची पण तरतूद करून ठेवावी लागणार. ते कसे जमते ते बघायला हवे. संजय व मार्था डॉक्टर आहेत. ते भरपूर कमावतात. त्यामुळे त्यांनी तुमची सोय छान करून दिली आहे. तुम्हाला आवडले व मलाही वाटले तरी तुम्हाला इथे कायम ठेवणे मला जमणार नाही. तुम्हाला तिथेच रहावे लागेल. किसनरावांना श्रीकृष्णनगरची आठवण झाली. आपले दोर कापले गेले आहेत हे जाणवून आल्या परिस्थितीला तोंड देणे प्राप्त आहे असा विचार त्यांच्या मनात आला. पंधरा दिवसांनी ते परत आपल्या तुरुंगात परतले.

आल्यानंतर विजयला फोन केला तेव्हा विजय म्हणाला, त्याचा मित्र सुभाष. तो त्याचा शाळा सोबती होता. तो न्यू जर्सीलाच राहतो असे त्याला आताच कळले. त्याच्याशी बोलून विजयला फार बरे वाटले. विजयने त्याला पपांचा म्हणजेच किसनरावांचा फोन नंबर दिला आहे. तो नक्की फोन करणार आहे. किसनरावांनी हो म्हटले पण त्यांना वाटले सख्ख्या मुलाला शेजारी राहून बोलायला वेळ नाही हा परका कशाला कौतुकाने फोन करणार? पण

खरेच आश्चर्य! सुभाषचा फोन आला. तो स्वतः भेटून गेला. एवढेच नव्हे तर येत्या शनिवारी मी तुम्हाला माझ्या घरी न्यायला येतो असे सांगून गेला. किसनरावांनी हे संजयच्या कानावर घातले. संजय म्हणाला, 'न्यायला आला तर जा त्याच्याबरोबर तेवढाच तुम्हाला बदल!'

शनिवारी आठ वाजताच सुभाषचा फोन आला. 'बाबा, काकू तुम्ही तयार राहा. मी दहा वाजेपर्यंत येतो. सांगितल्याप्रमाणे तो बरोबर दहा वाजता आला व त्यांना आपल्या घरी घेऊन निघाला. त्याच्या कॉम्प्लेक्समध्ये शिरल्यावर मोकळी हवा, गर्द हिरवळ, उंच उंच झाडे, मध्यभागी छान गार्डन त्यात मुलांसाठी झोपाळे, घसरगुंड्या, बाहेरून मोठ्यांसाठी वॉकिंग ट्रॅक सर्व पाहून किसनराव खूश झाले. त्यांना वाटले, संजयने इथे का नाही घर घेतले. सुभाषची बायको सुधा पण प्रेमळ होती. तिने दोघांचे छान स्वागत केले. छोटा अनिष आजी म्हणून वासंतीला चिकटला तर मोठी सोनी आजोबांचा हात धरून त्यांना आपल्या खोलीत घेऊन गेली. छान गप्पा गोष्टी करत जेवण झाले. झोपही झाली. मग किसनराव म्हणाले, अरे तुझा कॉम्प्लेक्स छान आहे जरा फिरून येऊ या का? सुभाष व ते फिरायला बाहेर पडले. त्यांना ती जवळ जवळ असलेली घरे वाटेत सुभाषला हटकून 'कोण पाहुणे?' असे विचारणारे भारतीय बघून आपण आपल्या गावात आहोत असे वाटले. ते सुभाषला म्हणाले, संजयला इथे बंगला मिळणार नाही का? त्यावर म्हणाला इथे स्वतंत्र बंगले नाहीत. इथे छोटी घरं, रो हाऊस आहेत. इथे वृद्धांसाठी दोघांनी राहण्यायोग्य अशी पण काही घरे आहेत. हा परिसर अति श्रीमंतांचा नाही, मध्यम स्थितीतल्या लोकांचा आहे.

त्या दिवशी घरी आल्यावर जेव्हा संजय त्यांना भेटायला आला तेव्हा किसनरावांनी सुभाषकडे कशी मजा आली ती हकीकत आनंदाने त्याला सांगितली. पुढे म्हणाले, नाहीतरी आम्ही दोघे इथे वेगळेच राहतो. बाहेरचा वारासुद्धा आम्हाला इथे मिळत नाही. त्यापेक्षा तू आम्हाला तिथे एक छोटं घर घेऊन दिलेस तर तिथे आमचा वेळ चांगला जाईल. जवळपास शॉपराइट, के मार्ट, इंडियन स्टोअर चालून जाण्याच्या अंतरावर आहे. निदान आम्ही मोकळेपणी फिरू शकू. तू विचार कर आणि तुझ्या वाटेवरच असल्याने तुलाही तिथे येणे सहज शक्य आहे.

संजयला वडिलांचे बोलणे प्रथम विचित्र वाटले. आपल्या मुलाच्या घरी राहायचे सोडून त्यांना दुसरीकडे जावे असे का बरे वाटले? पण विचार केल्यावर त्याला पटले की इथे ते फार एकटे पडतात. मार्था व मुले

त्यांच्याकडे फिरकत नाही. त्यांना आपल्या कार्यक्रमात सहभागी करून घेत नाहीत. ठरावीक महिन्यांनी ती त्यांचे मेडिकल चेकप करून घेते तेवढेच. मुलांना तर आजी आजोबांशी जाऊन बोला अशी आठवण करून द्यावी तरी त्यांना वेळ नसतो. बघू या काय करायचे ते. त्याला बोरिवलीच्या त्यांच्या सोसायटीची, त्याच्या मित्रांची आठवण झाली. तिथे शेजारी म्हणजे कुटुंब सदस्यच वाटायचे. इथे कुटुंब म्हणजे आई, वडील व मुले. त्या पलीकडे काही नाही. फक्त 'फादर्स डे', मदर्स डे' आणि 'थँक्स गिव्हिंग'च्या वेळी इतरांची आठवण करायची. दुसऱ्या दिवशी त्याने सुभाषला फोन केला. चौकशी केली. सुभाष म्हणाला, त्याच्या माहितीतल्या एकाला एक बेडरूमचे घर विकायचे आहे, कारण त्याने मोठे घर घेतले आहे. संजय सुभाषकडे गेला व घराबद्दल सर्व माहिती घेतली. एका एजंटला गाठून सर्व व्यवहार पुरे केले व ते घर विकत घेतले. या अवधीत त्याने मार्थाला आईवडिलांची इच्छा सांगितली. तिने त्याला विरोध दर्शविला नाही, उलट त्यांना जिथे आवडते तिथे राहू दे माझे काही ऑब्जेक्शन नाही व नवीन घर घेण्यात काहीच हरकत नाही. ती पण इन्व्हेस्टमेंट आहे. त्यामुळे नो प्रॉब्लेम असे म्हणाली. शिफ्टिंगच्या कामात सुभाषने त्याला खूप मदत केली. किसनराव व वासंती नव्या घरात राहायला गेली. पहिल्या दिवशी सुधाने जेवायला बोलावले. नंतर शनिवार रविवारी घर लावायला मदत केली.

समोर छोटसं गार्डन, मागे मोठे वृक्ष, घराची मांडणी छान होती. गॅलरीत बसले की रस्त्यावरून जाणारे लोक, मध्यवर्ती बागेत खेळणारी मुले. धावण्याचा व्यायाम करणारी तरुण पोरे, फिरणारे लोक सर्व दिसे. किसन-वासंती सुखावली. शांत अरण्यातून गावात परतल्यासारखे त्यांना वाटले. आता त्यांचा वेळ चांगला जाऊ लागला. दररोज सकाळी उठून योगासने करायची. नंतर गॅलरीत बसून चहापान. जाणारी येणारी माणसे त्यांना 'हॅलो' म्हणून अभिवादन करीत त्यांना बरे वाटे. नंतर मुलांच्या शाळेच्या बसेस येत. त्यांचा थांबा गार्डनजवळ होता. नाना गणवेशातील ती मुले दिसत. मुलेही तिकडून गँडपा, गँडपा बाय! म्हणून हात करीत. ती सर्व गडबड आटपली की आंघोळ, जेवण! जेवण झाल्यावर वामकुक्षी. मग टी.व्ही.चे थोडे कार्यक्रम बघेपर्यंत दुपार होई व मुलांची शाळेतून येण्याची वेळ होई. समोर परत वर्दळ सुरू होई. मुले येत तेव्हा आसमंत चैतन्याने भरून जाई. त्यानंतर चाकरमन्यांच्या गाड्या येत. एकेक घर उजळू लागे. हे सर्व गॅलरीतून न्याहाळताना रात्र हळूहळू अंधारून येई. दोघेही दमून जात. रात्रीचे जेवण

घेऊन ते झोपी जात. इथे त्यांना झोपही चांगली लागे. कारण सबंध दिवस मन व शरीर कामात तरीही उल्हसित राही. सुभाष व सुधा दोनचार दिवसाआड फेरी मारत. रोजचा फोन ठरलेला असे. हळूहळू इतरही मराठी कुटुंबे त्यांची खबर घ्यायला येऊ लागली. त्यानंतर त्या सर्वांना किसनवासंतीने एकदा एकत्र घरी बोलावले. चहा पाण्याची व्यवस्था सुधानेच केली. पण त्या मीटिंगमध्ये किसनरावांनी सुचवले की, ती दोघे छोट्या कंपनीला मराठी गाणी शिकवतील. आपल्या सणावाराबद्दल माहिती देतील. रामायण-महाभारतातील गोष्टी सांगतील व या सर्वांची गोडी लागली की हळूहळू त्यांना मराठी मुळाक्षरे शिकवतील. सर्वांनी ही कल्पना उचलून धरली. त्यासाठी शनिवार हा दिवस सर्वानुमते ठरला. कारण शनिवारी पालकवर्गाला आठवड्याभराची कामे निपटायची असतात. मुले इथे अडकली तर कामे अधिक सुलभतेने आवरतील व रविवार बाहेर फिरायला मोकळा राहिल. आता या दोघांना अतिशय उत्साह आला. हे काम ते प्रेमाने, आपलेपणाने करू लागले. मुलांसाठी नवीन नवीन गाणी आठवून लिहून ठेवू लागले. मुलांना पण या आजी आजोबांची इतकी गोडी लागली की त्यांचे वाढदिवस, पिकनिकमध्ये या आजी आजोबांना आवर्जून सहभागी करून घेऊ लागले. तसेच गार्डनमध्ये फिरायला गेल्यावर ओळखीचे झालेले समवयस्क त्यांचे मित्र झाले. सप्ताहाच्या इतर दिवशी या ज्येष्ठ नागरिकांच्याही मीटिंगा होऊ लागल्या. समवयस्कांच्या गप्पात मने रमू लागली. जीवनाला आता गती मिळाल्यासारखी वाटू लागली. तहानलेल्या जीवाची तहान थंडगार तळ्याच्या पाण्याने शांत व्हावी तसे झाले. मन प्रसन्न राहू लागले. संजयची नियमित फेरी असे. त्याला हा बदल पाहून आनंद झाला. तो आठवड्याचे सामान भरत असे. किसनरावांकडे पैसे पण देऊन ठेवत असे, पण आता आयत्या वेळी काही जास्त कमी हवे असेल तर कोणीही त्यांना आणून देई. आता आजी मुलांसाठी वड्या, लाडू, चिवडा, चकल्या बनवत राही. संजयला पण त्याची गोडी चाखायला मिळे. अशा वेळी त्याला त्याचे बालपण आठवे. आईवडिलांची ही जीवनचर्या पाहून संजयचे मन आनंदले. आता त्याला त्यांची चिंता उरली नाही. त्यांचे उत्तरायण सुरळीत मार्गी लागले होते.

(ललना दिवाळी अंक, २००७)

❀❀❀

**- नलिनी करंडे**